हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' मोहिमेला वेग - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >> पान 2

कृषी विभागामार्फत विविध पुरस्कार आता ऑनलाईन पध्दतीने स्विकारणार : कृषि मंत्री दत्तात्रय भरणे >> पान 3

शेतकऱ्याची एक हेक्टर आंब्याची बाग आगीत जळून खाक; १० ते १५ लाखांचे नुकसान >> पान 4

**सुविचार**

'चूक होणं स्वाभाविक आहे, पण ती सुधारणं शहाणपण आहे.


दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 232 ■ बुधवार, दि. 01 एप्रिल 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




साऊथ अभिनेत्री नयनतारा पहिल्यांदा सलमान खानबरोबर करणार काम, निर्मात्यांनी केला खुलासा आतील पान

## सेवाकार्यात जैन समाजाचे योगदान मोलाचे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भगवान महावीरांनी शांतीचा आणि सेवाभावाचा मार्ग दाखविला. सेवाकार्यात नेहमीच अग्रेसर राहून जैन समाजाने आदर्श निर्माण केला असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

बोरीवली पश्चिम येथील कोरा केंद्र मैदान येथे सकल जैन समाज यांच्या वतीने भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, महापौर रितू तावडे, आमदार पराग शहा, अमित साटम, संजय उपाध्याय, गुरुदेव नम्र मुनी तसेच मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, देशाच्या प्रगतीत जैन समाजाचे योगदान मोलाचे आहे. गोसेवा आणि सेवाकार्यातही जैन समाज अग्रेसर आहे. भगवान महावीर यांनी दाखवलेला मार्ग मानवतेच्या कल्याणाचा असून या विचारांतूनच विश्व कल्याण साधले जाऊ शकते.





तीर्थंकरांचे विचार सर्वांना सोबत घेवून जाणारे आहेत. समाजाच्या वतीने साकारण्यात येणारी प्राणी रुग्णालयाची संकल्पना भूतदया अधोरेखित करणारी आहे. वारकरी परंपरेशी घट्ट नाळ जोडलेल्या मुंबईतील डबेवाले यांना ई-बाईक्स वितरणाचा उपक्रमही अतिशय स्तुत्य असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, भगवान महावीर यांनी अहिंसेचा संदेश दिला. अखिल मानवतेसाठी त्यांनी मार्ग दाखविला. या मार्गाचे अनुसरण सर्वांनी करण्याची गरज असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले, जैन समाज हा भारतीय समाज-संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे असल्याचे श्री लोढा यांनी सांगितले.

महापौर रितू तावडे म्हणाल्या, भगवान महावीर यांचा शांतीचा संदेश आजच्या परिस्थितीत अत्यंत महत्त्वाचा आहे.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते अरहम प्राणी रुग्णालयाच्या संकल्पनेचे उद्घाटन तसेच मुंबईतील डबेवाले यांना १०८ ई बाईक्सचे वितरण करण्यात आले. दिव्यांगांना ५० ई ट्रायसिकलचे वितरणही यावेळी करण्यात आले.

## मध्य महाराष्ट्रात वादळी पावसाचा इशारा; नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय हवामान खात्याच्या ३० मार्च २०२६ रोजीच्या पाच दिवसीय अंदाजानुसार आज मध्य महाराष्ट्रासह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये वीज चमकणे, गारपीट आणि वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

हवामान खात्याने दिलेल्या सूचनांनुसार, विजेचा कडकडाट ऐकू आला की तात्काळ घरात किंवा सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. झाडाखाली, शेतात, पाण्याजवळ किंवा लोखंडी वस्तूंच्या जवळ उभे राहणे टाळावे. मोकळ्या जागेत मोबाईल फोनचा वापर करू नये. तसेच निवाऱ्यापासून दूर असल्यास जमिनीवर न पडता पाय एकत्र करून बसून राहावे, असेही सांगण्यात आले आहे.

प्रशासनाने ग्रामपंचायत, पोलीस आणि आरोग्य विभागामार्फत तातडीने जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या आहेत. रुग्णवाहिका व अग्निशमन दल सतर्क ठेवण्यात यावेत, तसेच शाळा, सभागृहे व सार्वजनिक इमारती सुरक्षित आश्रयस्थळ म्हणून खुले ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हवामान खात्याचे अद्ययावत संदेश गावपातळीपर्यंत पोहोचवण्यावरही भर देण्यात आला आहे.

दरम्यान, शेतकरी बांधवांनी विजेच्या इशाऱ्याच्या काळात शेतातील कामे टाळावीत, बांधकाम स्थळांवरील कामकाज तात्पुरते थांबवावे, तसेच यात्रास्थळे व मोठ्या जमावाचे कार्यक्रम तातडीने स्थगित करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राच्या वत्तीने कळविण्यात आले आहे.

## केवळ संशयाच्या आधारावर आरोपीला हत्येसारख्या प्रकरणात दोषी ठरवता येणार नाही - उच्च न्यायालय


**मुंबई/प्रतिनिधी :** एखाद्यावर संशय कितीही प्रबळ असला तरी केवळ त्या संशयाच्या आधारावर आरोपीला शिक्षा ठोठावता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयानं एका प्रकरणात दिला आहे. आरोपीवर निव्वळ संशय असणं पुरेसं नाही. आरोपीचा गुन्हा हा सबळ पुराव्यांनिशीच सिद्ध व्हायला हवा, असं आपल्या निकालात नमूद करत न्यायमूर्ती मनिष पितळे आणि न्यायमूर्ती श्रीराम शिरसाट यांच्या खंडपीठानं आरोपीला निर्दोष ठरवत त्याला सुनावलेली जन्मठेपेची शिक्षा रद्द केली आहे.

उच्च न्यायालयाचा निकाल काय? : एक किंवा दोन परिस्थितीजन्य पुराव्यांच्या आधारावर एखाद्या आरोपीला दोषी ठरवता येणार नाही. त्याकरता पुराव्यांची साखळी पूर्ण व्हायला हवी, तरच आरोपीला शिक्षा देता येईल, असंही स्पष्ट करत आयपीसी कलम ३०२ अंतर्गत खुनाच्या आरोपांखाली एका आरोपीला ठाणे सत्र न्यायालयानं साल २०१२ मध्ये ठोठावली जन्म ठेपेची शिक्षा मुंबई उच्च न्यायालयानं रद्द केली आहे. आरोपीवर निव्वळ संशय असणं पुरेसं नाही. आरोपीचा गुन्हा हा सबळ पुराव्यांनिशीच सिद्ध व्हायला हवा, असं आपल्या निकालात नमूद करत न्यायमूर्ती मनिष पितळे आणि न्यायम ूर्ती श्रीराम शिरसाट यांच्या खंडपीठानं आरोपीला निर्दोष ठरवत त्याला सुनावलेली जन्मठेपेची शिक्षा रद्द केली आहे.

## अशोक खरातच्या घरात एसआयटीची सिनेस्टाईल एन्ट्री, मुलाला घेतलं ताब्यात, पत्नी फरार

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** महिला लैंगिक शोषण प्रकरणी एसआयटीनं भोंदूबाबा अशोक खरातची चौकशी सुरू केली असून, अनेक धक्कादायक माहिती समोर येत आहे. अशोक खरातची पोलीस कोठडी बुधवारी संपत असल्यानं एसआयटी पथकानं तपासाची व्याप्ती वाढवली आहे. सबळ पुरावे गोळा करण्यासाठी एसआयटीनं मंगळवारी अशोक खरातच्या कर्मयोगी नगरमधील बंगल्यावर धडक कारवाई केली. यावेळी त्यांनी सिनेस्टाईल पद्धतीनं बंगल्यात प्रवेश करून खरातच्या मुलाला ताब्यात घेतलं असल्याचं समोर आलं आहे.



अशोक खरातचा मुलगा ताब्यात - एसआयटीनं अशोक खरातच्या ऑफिसची झडती घेतली होती. त्यानंतर मंगळवारी सायंकाळच्या सुमारास खरातच्या बंगल्याच्या भिंतीवरून उड्या घेत एसआयटीनं आत प्रवेश केला. यावेळी खरातचा मुलगा हर्षवर्धन याला ताब्यात घेतलं. मात्र, खरातची पत्नी कल्पना ही दुपारीच फरार होण्यात यशस्वी झाली असल्याची माहिती समोर येत आहे. कल्पना खरात फरार झाल्याचं लक्षात येताच तिला ताब्यात घेण्यासाठी तातडीनं पोलीस पथकं रवाना करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. खरातच्या अनेक मालमत्तांमध्ये त्याची पत्नी आणि मुलाचा सहभाग असल्यानं एसआयटीनं ही धडक कारवाई केली.

नाशिकमधील डॉक्टर रडारवर - भोंदूबाबा खरात याने भविष्य सांगण्याच्या बहाण्याखाली पीडित महिलांचा गैरफायदा घेत शरीरसंबंध ठेवल्याचं समोर आलं. याचे व्हिडिओ सोशल मीडियाच्या माध्यमातून समोर आले आहेत. अशात आता एक धक्कादायक नवा कारनामा समोर आलाय. पीडित महिलांशी शरीरसंबंध ठेवत असताना अशोक खरात महिलांना नकळत नको ते औषध देत होता का? ज्यामुळं महिला त्याच्या जाळ्यात अलगद फसत होत्या, याचा तपास एसआयटी करत असून, यामुळं नाशिकमधील काही नामांकित डॉक्टर देखील तपास यंत्रणांच्या रडारवर आले आहेत. यामुळं वैद्यकीय क्षेत्रात देखील मोठी खळबळ उडण्याची शक्यता आहे.

काय आहे नेमकं प्रकरण? - महिला बलात्कार प्रकरणी सध्या एसआयटी पथकाच्या पोलीस कोठडीत असलेल्या अशोक खरातची कसून चौकशी सुरू आहे. महिलांना जाळ्यात ओढल्यानंतर त्यांच्याशी शरीरसंबंध ठेवल्यानंतर त्यांना गर्भधारणा होऊ नये यासाठी अशोक खरात काही विशिष्ट औषधे किंवा गर्भनिरोधक गोळ्या देत होता का? आणि ही औषधे त्याला कोणत्या डॉक्टरांच्या सल्ल्याने मिळत होती? त्या दिशेनं देखील आता तपास सुरू झाला आहे. यासाठी पोलिसांनी खरातच्या मोबाइलमधील डॉक्टरांची यादी तयार केली असून, त्यांच्या क्लिनिक किंवा मेडिकल स्टोअर्समधून कोणत्या प्रकारच्या औषधांची खरेदी-विक्री झाली याचा रेकॉर्ड तपासला जाण्याची शक्यता आहे. यातून नाशिकमध्ये बडे डॉक्टर पोलिसांच्या जाळ्यात अडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## अहिल्यानगरमध्ये तलावात तीन लहान मुले बुडाली, एकाचा मृतदेह काढला बाहेर, दोन जणांचा शोध सुरु

दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील सोनई इथं धक्कादायक घटना घडली आहे. साठवण तलावात तीन लहान मुले बुडाल्याची घटना घडली आहे. ८ ते १२ वर्ष वयाची ही मुले पोहताना बुडाली आहेत. दुपारी तीन ते चार वाजण्याच्या दरम्यान ही दुर्घटना घडली आहे. पाण्याचा अंदाज न आल्याने ही दुर्घटना घडली आहे. दरम्यान, मुले बुडाल्याची माहिती मिळताच स्थानिक लोक एकत्र आले. त्यानंतर लगेच पोलीसही घटनास्खळी दाखल झाले आहेत. स्थानिक नागरिक आणि पोलीसांच्या मदतीने एकाचा मृतदेह बाहेर काढण्यात यश मिळालं आहे. आणखी दोन मुलांचा शोध सुरु आहे. पोलीस आणी बचावपथक घटनास्थळी दाखल झाले आहे. दरम्यान, या घटनेमुळं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## अश्विनी भिडेंच्या नियुक्तीमागे राजकारण रंगलं

### फडणवीसांचा पुन्हा एकदा शिंदेंना शह, महापालिकेवर वरचष्मा कायम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** सर्वाचंच लक्ष लागलेल्या मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदी अखेर अश्विनी भिडे यांची वर्णी लागली आहे. अश्विनी भिडे या मुंबई पालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त असणार आहेत. भिडे आयुक्तपदी विराजमान झाल्या असल्या तरी त्यावरुन पडद्यामागे मोठं राजकारण रंगल्याचं दिसलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून अश्विनी भिडेंच्या नावाला विरोध असल्याची चर्चा होती. त्यामुळे भिडे यांनी सोमवारी रात्री उशिरा एकनाथ शिंदेंची भेट घेतली. त्यानंतर त्यांचा विरोध मावळल्याची चर्चा आहे. या सगळ्या राजकारणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा एकनाथ शिंदेंना शह दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

मुंबईचा विकास वेगवान व्हावा यासाठी प्रयत्न करणाऱ्या, मोठे प्रकल्प वेळेत पूर्ण करणाऱ्या आणि मेट्रो वूमन अशी ओळख असलेल्या अश्विनी भिडे आता पालिका आयुक्तपदी विराजमान झाल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अत्यंत विश्वासू सहकारी अशी ओळख असलेल्या अश्विनी भिडे यांच्या निवडीने मुख्यमंत्र्यांचाच पालिकेवर वरचष्मा आहे हे पुन्हा एकदा सिद्ध झालं आहे. पालिका आयुक्तपदासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अप्पर मुख्य सचिव असीम गुप्ता, मिलिंद म्हैसकर यांची देखील नावे चर्चेत होती. मात्र, या सर्वांना मागे टाकत अश्विनी भिडे मुंबई पालिका आयुक्त झाल्या आहेत.

दरम्यान, मेट्रो कारशेडसाठी रात्रीतून झाडं तोडण्यात आल्यानं पर्यावरणवाद्यांकडून अश्विनी भिडेंना मोठा विरोध झाला होता. महाविकास आघाडीचं सरकार आल्यानंतर अश्विनी भिडेंची मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त म्हणून बदली करण्यात आली होती. तर महायुतीचे सरकार आल्यानंतर एमएमआरसीएलची पुन्हा जबाबदारी पुन्हा एकदा अश्विनी भिडे यांच्याकडे देण्यात आली.

उपमुख्यमंत्री आणि मुंबईचे पालकमंत्री असलेल्या एकनाथ शिंदे यांच्याकडून असीम गुप्ता यांच्या नावाला पसंती असल्याची चर्चा होती. मात्र, मुख्यमंत्री हे अश्विनी भिडे यांच्या नावावरच ठाम असल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पालिका आयुक्तपदावरुन शह दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.


मुंबई महापालिका आयुक्तपदासाठी आपल्या मर्जीतला अधिकारी असावा यासाठी एकनाथ शिंदे आग्रही होते. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अश्विनी भिडे यांची वर्णी लावली. दरम्यान, येत्या काळात मुंबईकरांच्या सेवेत अनेक मोठे प्रकल्प येणार आहे. ज्यात कोस्टल रोड, गारगाई धरण, पार्किंग आणि अंडरग्राऊंड प्रकल्पांचा समावेश आहे. अशात, अश्विनी भिडे यांच्या मागील कामाचा अनुभव बघता त्या या दृष्टीकोनातून उजव्या ठरतील. त्यामुळे, मुख्यमंत्र्यांनी शिंदेंना शह देताना पालिकेत आपला वरचष्मा देखील कायम ठेवल्याची चर्चा आहे.

**मुंबई पालिकेत महिलाराज!**

- अश्विनी भिडे १९९५ बॅचच्या आयएएस अधिकारी
- एमएमआरसीएलच्या प्रमुख म्हणून मुंबई
- मेट्रो-३ प्रकल्पामुळे 'मेट्रो वुमन' म्हणून समोर
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रधान सचिव आणि अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून अश्विनी भिडे यांची ओळख

**महापालिकेवर मुख्यमंत्र्यांचाच वरचष्मा कायम**

एमपीसीबीचे तत्कालीन सदस्य सचिव देवेंद्र सिंह यांचे सभागृहात निलंबन झाले होते. त्यांची पुन्हा एकदा वर्णी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळावर लागेल अशी चर्चा होती. मात्र, त्या ऐवजी राहुल रेखावार यांची त्या पदावर नियुक्ती करण्यात आली. तर देवेंद्र सिंह यांना मुंबई पालिकेत सह पालिका आयुक्त म्हणून नियुक्ती देण्यात आली. सातारा प्रकरणी उपसभापती गोऱ्हे यांचे निलंबनाचे आदेश बदलत चौकशी करण्याचे आदेश दिले गेले. दरम्यान, तुषार दोशींची चौकशी होईपर्यंत त्यांना बाजूला सारल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं असलं तरी भाजपला जे अपेक्षित होतं तेच झाल्याची राजकीय वर्तुळात चर्चा झाली.





## आखाती युध्द : मध्यस्थीतून पेच सुटेना

आंतरराष्ट्रीय राजकारणात क्वचितच काही विनोदी घटना घडतात. इराण-अमेरिका युद्धासारख्या भीषण घडामोडींमध्ये अशीच एक विनोदी घटना घडली आहे. आता पाकिस्तान म्हणे इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्ध थांबविण्यासाठी मध्यस्थी करणार आहे. गेल्या आठवड्यात तुर्कीये व इजिप्त या देशांच्या नेत्यांनी इराण व अमेरिका-इस्रायल यांच्यातील युद्ध थांबविण्यासाठी वाटाघाटी करण्याची तयारी दर्शविली होती. अमेरिकेनेही त्यास मंजुरी दिली. या देशांमध्ये पाकिस्तानने घुसखोरी केली असून, अमेरिकी व इराणी अधिकाऱ्यांनी इस्लामाबादमध्ये या वाटाघाटी करण्याची सूचना केली आहे. तुर्कीये, इजिप्तसह सौदी अरबचे परराष्ट्रमंत्री नुकतेच इस्लामाबादमध्ये जमले होते पण, त्यातून काही ठोस निष्पन्न झालेले नाही. इराणने अमेरिकेशी कोणत्याही प्रकारे चर्चा करण्यास साफ नकार दिला आहे. युद्धबंदीच करायची असेल, तर ती आपल्या अटींवर केली जाईल, हे इराणने ठासून स्पष्ट केले आहे. अर्थात, इराणकडून यापेक्षा वेगळी प्रतिक्रिया अपेक्षितच नव्हती. तरीही, इराणचे काही वरिष्ठ नेते पडद्याआडून युद्धबंदीसाठी प्राथमिक स्तरावर चर्चा करीत आहेत, हे सत्य आहे. मात्र, या संभ्रमाच्या वातावरणात पाकिस्तानने एक मध्यस्थ म्हणून आपला चंचुप्रवेश करण्याची संधी साधली आहे. मध्यस्थी करणाऱ्या व्यक्तीची किंवा देशाची, दोन्ही पक्षांमध्ये काही प्रमाणात तरी विश्वासार्हता असणे आवश्यक असते. जगातील बाकीचे देश सोडाच, पाकिस्तानची मुस्लीम देशांमध्येही काही विश्वासार्हता नाही. पाकिस्तान हा अमेरिकेचा बाहुला आहे, हीच त्याची प्रतिमा जगभर ठळकपणे दिसून येते. त्याच्यावर इराणी नेते कसा विश्वास ठेवतील? शिवाय, या संघर्षाला शिया-सुन्नी असाही पैलू आहे. पाकिस्तान हा सुन्नीबहुल देश असून, इराण हा शियाबहुल देश आहे. पाकिस्तानचा बोगस फील्डमार्शल असीम मुनीर याने, काही कालापूर्वी पाकिस्तानातील शियांना इराणमध्ये चालते व्हा, असा इशारा दिला होता. पाकिस्तानात शिया-सुन्नी दंगली या नेहमीच सुरू असतात. गेल्या काही वर्षांत पाकिस्तान चीनच्याही कच्छपी लागला होता. थोडक्यात, जो त्याला खायला देईल, त्याची पिपाणी वाजविण्यास पाकिस्तान कायमच पुढे असतो. याचे कारण, पाकिस्तान हा आर्थिकदृष्ट्या तर दिवाळखोर झालाच आहे पण, तो राजकीयदृष्ट्याही दिवाळखोर आहे. त्यामुळे त्याची स्वत:ची अशी कसलीच ठाम भूमिका नसते. कोणे एकेकाळी अमेरिकेला कम्युनिस्ट चीनबरोबर संबंध सुधारायचे होते. त्यामागे तिची आर्थिक कारणे होती. तत्कालीन जागतिक परिस्थिती खूपच वेगळी असल्याने, अमेरिकी परराष्ट्रमंत्र्यांना गुप्तपणे चीनमध्ये जाण्यासाठी एका सुरक्षित जागेची गरज होती. ते पाकिस्तानचा अधिकृत दौरा असल्याचे निमित्त करून, इस्लामाबादला आले आणि तेथून त्यांनी गुप्तपणे बीजिंगला प्रयाण केले. त्यानंतर अमेरिका व चीनने आपापल्या देशांचे हितसंबंध जपत एकमेकांशी आर्थिक संबंध निर्माण केले. पाकिस्तानमधून अमेरिकेचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री हेन्री किसिंजर यांना चीनला जाणे सोयीचे होते. पाकिस्तानची भूमिका त्यांना फक्त आपल्या देशात येऊ देणे इतकीच होती कारण, अमेरिका व चीनने आपसांत राजनैतिक संबंध जोडले, ते आपल्या देशाचे हितसंबंध जपण्यासाठी. त्यामुळे तेव्हाही या महत्त्वपूर्ण घडामोडीत पाकिस्तानची राजनैतिक अशी काहीच भूमिका नव्हती. पण, जणू हे संबंध आपल्यामुळेच जुळले गेल्याच्या भ्रमात पाकिस्तान वावरत असतो. त्यामुळे आपले जगात हसे होते, याचीही त्याला जाणीव नाही. आताही हे युद्ध थांबविणे ही जणू काही आपलीच जबाबदारी असल्याच्या थाटात पाकिस्तान वावरत आहे, ते पाहताना जगाला मनोरंजक वाटते. पाकिस्तान मध्यस्थी करणार म्हणजे नेमके काय करणार? पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री मोहम्मद इशाक दर यांनी नुकतेच सांगितले की, ''आम्ही अमेरिकी सरकारकडून आलेले निरोपाचे लिफाफे इराणी दूतावासाकडे सोपवीत आहोत''. म्हणजे, हे पाकिस्तानी केवळ पोस्टमनचे काम करणार असे दिसते. अर्थात, भारत केवळ दलाली देश बनू शकत नाही, हे परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी स्पष्ट केले आहे. पाकिस्तानच्या या अतिउत्साही; पण पोकळ दिखाव्यामुळे भारतातील विरोधी पक्षातील काही नेत्यांना आनंदाचे भरते आले आहे. या नेत्यांकडून जागतिक स्तरावर पाकिस्तानने भारताला मात दिली, इराणी युद्धासारख्या महत्त्वपूर्ण घडामोडीत भारताला दुर्लक्षित केले, पाकिस्तानने जागतिक मुत्सद्देगिरीत भारताला मागे टाकले वगैरे काहीही टीका-टिप्पणी केली जात आहे. जागतिक घडामोडी आणि मुत्सद्देगिरी कशाशी खातात, याची अक्कल नसलेले हे नेते भारताला हीन ठरविण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण, जगातील अनेक देशांची तेलवाहू जहाजे इराणने होर्मुझच्या आखातात अडकवून ठेवली असताना, फक्त भारताची जहाजे तेथून सुरक्षितपणे खनिज तेल व नैसर्गिक वायूची वाहतूक करीत आहेत, हे या अज्ञानी लोकांना दिसत नाही. पाकिस्तानात पेट्रोल-डिझेलचे दर किती आहेत आणि त्याची उपलब्धता किती आहे आणि भारतासारख्या खंडप्राय देशात या इंधनाचे दर व उपलब्धता काय आहे, यावर नजर टाकल्यास पाकिस्तानच्या या कथित मुत्सद्देगिरीची हवा निघून जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्याशी आतापर्यंत दोनदा फोनवर चर्चा केली असून, भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर हेही इराणी नेतृत्वाच्या संपर्कात आहेत. तेथून भारतीयांना सुखरूपपणे मायदेशात आणण्यात आले आहे. आपण जगातील समस्त मुस्लीम देशांचे एकमेव प्रतिनिधी असल्याचे पाकिस्तानला दाखवून द्यायचे आहे. पण, या अतिदरिद्री आणि संधिसाधू देशाला मुस्लीम जगतात कोणी विचारीत नाही. तुर्कीये आणि सौदी अरब या देशांमध्ये इस्लामी देशांचे खलिफा होण्यासाठी स्पर्धा सुरू असते. ते पाकिस्तानसारख्या कमजोर आणि बेभरवशाच्या देशाला कसे पुढे येऊ देतील? इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्या साठमारीत पाकिस्तानने आपले तोंड न घातलेलेच बरे. कारण, त्याचा या संघर्षाशी तसा काही संबंध नाही. अन्यथा, या दिग्गजांच्या मारामारीत त्याचे कंबरडे शेकून निघेल. पण, इतका पोच पाकिस्तानी नेतृत्वाकडे नसल्याने या जागतिक संघर्षात त्याची निरर्थक लुडबूड पाहताना जग आपली करमणूक करून घेईल.

# हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' मोहिमेला वेग - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** :महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून हत्तीरोगाचे संपूर्ण उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, विशेषतः दुर्लक्षित असलेल्या हत्तीरोगासारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्र राज्यात विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र सरकारकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, देशातून हत्तीरोग निर्मूलन करण्याच्या प्रधानमंत्री यांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे.

**राज्यात ५५ लाख नागरिकांना औषधोपचाराचा लाभ देण्याचे उदिष्ट**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर 'मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन' (एमडीए) मोहीम राबवली जात असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. या मोहिमेत पात्र नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते. राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते.

महाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले आहे.

**नागपूर ग्रामीण भागात मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश**

महाराष्ट्रातील नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, अमरावती, अकोला, लातूर, धाराशिव, सोलापूर, जळगाव, सिंधुदुर्ग, नांदेड, ठाणे, पालघर, नंदुरबार, सोलापूर आणि यवतमाळ या १८ जिल्ह्यात या रोगाचा प्रादुर्भाव आहे. फेब्रुवारी २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील हत्तीरोगाच्या एकूण प्रकरणांपैकी सुमारे ७५ टक्के रुग्ण एकट्या नागपूर विभागात आहेत. सर्वाधिक प्रभावित पाच जिल्हे: भंडारा, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली आणि गोंदिया.



ट्रीपल ड्रग पॉलिसी (आयडीए) यशाचा दर: नागपूर ग्रामीण भागात या मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर ( एमएफ रेट) २०१४ मधील ४.९१ टक्क्यावरून २०२४ पर्यंत एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, 'आयडीए' उपचारामुळे मायक्रोफिलेरिया (परजीवी) कमी करण्यास अधिक परिणामकारक मदत होते, त्यामुळे रोगाचा प्रसार लवकर थांबवता येतो. राज्य शासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, अफवांवर विश्वास न ठेवता आरोग्य कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली ही औषधे घ्यावीत. समाजाच्या सक्रिय सहभागाशिवाय हत्तीरोग निर्मूलन शक्य नसल्याचेही तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

# मल्लिका, नूर अन् चांदणी, पाकिस्तानी विषारी क्रीम्सची छत्रपती संभाजीनगरमध्ये उघड्यावर विक्री, थेट किडनीवर होतोय हल्ला

**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : पाकिस्तानमधून येणाऱ्या वस्तूंवर केंद्र सरकारची कडक बंदी आहे. पण तरीही छत्रपती संभाजीनगर शहरात या वस्तूंची सर्रास विक्री सुरू असल्याचं धक्कादायक वास्तव समोर आलं आहे. सिटी चौक परिसरात पोलिसांनी टाकलेल्या धाडीत तब्बल ६० हजार रुपयांची पाकिस्तानी सौंदर्य प्रसाधनं जप्त करण्यात आल असून या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. पण या प्रकरणाला आणखी गंभीर वळण मिळालंय कारण या क्रिम्समुळे थेट किडनीवर परिणाम होत असल्याचा धक्कादायक खुलासा समोर आला आहे.

शहरात बंदी असलेल्या पाकिस्तानी क्रीम्सचा सुळसुळाट सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आणि सिटी चौक पोलिसांनी रविवारी मोठी कारवाई करत शहागंज, घासमंडी आणि सिटी सेंटर मॉल परिसरातील तीन दुकानांवर एकाच वेळी धाड टाकली.'हायलाईट कलेक्शन', 'ओम ट्रेडर्स' आणि 'फलक इम्पोरियम' या दुकानांमधून मल्लिका, गोल्डन पर्ल, नूर हर्बल, चांदणी यांसारखी क्रीम्स, साबण आणि सिरम जप्त करण्यात आले.

या कारवाईत एकूण ५९ हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतल आणि या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

क्रीममुळे किडनीवर परिणाम

मात्र या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे या क्रीम्सचा आरोग्यावर होणारा परिणाम. गोरं होण्यासाठी या क्रीम्सचा वापर करणाऱ्या काही तरुण-तरुणींनी आरोग्य बिघडल्याचा दावा केला आहे. पण गोरं होणं तर दूर, या क्रीम्समुळे थेट किडनीवर परिणाम झाल्याची माहिती समोर आली आहेष्ठ किडनी विकार तज्ज्ञ डॉक्टरांनी याबाबत गंभीर इशारा दिला आहे.

कोणत्या होत्या त्या क्रीम

त्वचा गोरी करण्याच्या नादात नागरिक स्वत:च्या आरोग्याशी खेळ करत असल्याचं चित्र आहे. तज्ज्ञांच्या मते अशा क्रीम्समध्ये घातक रसायनांचा वापर केला जातो. ज्यामुळे त्वचेचं नुकसान होण्यासोबतच किडनीवरही विपरीत परिणाम होऊ शकतो.

पाकिस्तानी क्रीमचा सुळसुळाट

मल्लिका क्रीम
झलक क्रीम
ग्लोरी क्रीम
गोल्डन पर्ल क्रीम
चांदणी क्रीम
उजूबा क्रीम
फेस फ्रेश क्रीम
नूर हर्बल क्रीम
न्यू फेस ब्युटी क्रीम
साबण आणि सिरम :
पारले गोल्ड साबण
ग्लोरी साबण
मल्लिका व्हिटॅमिन-ण सिरम

धक्कादायक म्हणजे, या सगळ्या क्रीम आणि सिरमवर केंद्र सरकारने बंदी घातली आहे. पण, चोरून हे क्रीम्स आणि सिरम छत्रपती संभाजीनगरमध्ये कसं पोहोचलं हा मोठा प्रश्न आहे. गोरं होण्याच्या हव्यासापोटी आपण स्वत:च्या आरोग्याशी खेळ तर करत नाही ना? कारण अशा क्रीम्समुळे सौंदर्य वाढत नाही. उलट शरीराला गंभीर आजारांचा धोका निमर्ण होतो. त्यामुळे अशा उत्पादनांपासून दूर राहणं हाच खरा सुरक्षित पर्याय आहे.

## साऊथ अभिनेत्री नयनतारा पहिल्यांदा सलमान खानबरोबर करणार काम, निर्मात्यांनी केला खुलासा

हैदराबाद : हिंदी सिनेसृष्टीतील अभिनेता सलमान खाननं सोमवार, ३० मार्च रोजी आपल्या नवीन प्रोजेक्टबद्दल घोषणा केली. याशिवाय त्यानं हा देखील खुलासा केला की, तो आगामी चित्रपट, राष्ट्रीय पुरस्कार विजेते चित्रपट निर्माते वामशी पैडीपल्ली आणि निर्माते दिल राजू त्यांच्याबरोबर काम करणार आहे. दरम्यान या चित्रपटाबाबत एक बातमी समोर आली आहे. निर्मात्यांनी आता चित्रपटाच्या मुख्य अभिनेत्रीचं नाव जाहीर केलंय. ३१ मार्च रोजी, श्री वेंकटेश्वरा क्रिएशन्सनं ६३ संदर्भात इंस्टाग्रामवर एक अपडेट शेअर केली. या प्रोडक्शन हाऊसनं खुलासा केला की, दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लेडी सुपरस्टार नयनतारा त्यांच्या आगामी चित्रपट ६३मध्ये मुख्य अभिनेत्री असेल.

# मराठी भाषेसाठी राजू बाविस्कर यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार प्रदान

नवी दिल्ली : साहित्य अकादमीतर्फे २०२५ या वर्षासाठी जाहीर करण्यात आलेल्या साहित्य पुरस्कारांचे आज येथे वितरण करण्यात आले. मराठी भाषेसाठी जळगाव येथील प्रसिद्ध चित्रकार व लेखक राजू बाविस्कर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मानचिन्ह, शाल आणि एक लाख रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

देशातील मान्यताप्राप्त २४ भाषांमधील उत्कृष्ट साहित्यकृतींना यंदाचे साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाले होते. त्यात मराठी भाषेसाठी जळगाव येथील प्रसिद्ध चित्रकार व लेखक राजू बाविस्कर यांच्या 'काळ्यानिळ्या रेषा' या आत्मकथेसाठी लेखक राजू बाविस्कर यांना हा सन्मान जाहीर झाला होता. नवी दिल्लीतील कमानी ऑडिटोरियममध्ये झालेल्या या विशेष समारंभात साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या हस्ते श्री. बाविस्कर यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रसिद्ध हिंदी साहित्यिक आणि साहित्य अकादमीचे



माजी अध्यक्ष विश्वनाथप्रसाद तिवारी, अकादमीच्या उपाध्यक्षा श्रीमती कुमुद शर्मा, संस्कृती मंत्रालयाचे संचालक अनीश राजन, अकादमीच्या सचिव श्रीमती पल्लवी होळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

साहित्यिकांना पुरस्कार देऊन सन्मानित करणे हे समाजाचे दायित्व असल्याचे सांगून श्री. विश्वनाथ प्रसाद तिवारी म्हणाले, की समाजातील या सृजनशील सकारात्मकतेचा गौरव झाला नाही तर समाज मूल्यहीन होऊन नष्ट होईल . त्यामुळे या सृजनाचा गौरव करणे ही अमूर्त स्वरूपातील समाजाचे प्रतिनिधी असलेल्या साहित्य अकादमीसारख्या संस्थांची जबाबदारी आहे. त्यासोबतच तो समाजाचा धर्म म्हणजेच कर्तव्यही आहे. साहित्यिकांच्या साहित्यातून समाजाला प्रेरक मुल्ये मिळत असतात. लेखक हा सदैव जागरूक असतो. त्याचे जीवन वैशिष्ट्यपूर्ण असते कारण तो एकाच जगण्यामरण्यात अनेक जगणे-मरणे अनुभवत असतो. असे सांगून त्यांनी पारतंत्र्याच्या कालखंडात प्रख्यात साहित्यिक भारतेंदू हरिश्चंद्र यांच्या साहित्याने एक युग निर्माण केले. त्यातून पुढे आलेल्या स्वदेशी आणि स्वभाषा या दोन्ही मूल्यांची पुढे चळवळ झाली, याचा दाखला दिला.

अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांनी पुरस्कारांमागची भूमिका विषद केली . सचिव श्रीमती होळकर यांनी प्रास्ताविक केले तर श्रीमती कुमुद शर्मा यांनी आभार मानले.

यंदाच्या पुरस्कारांमध्ये काव्यसंग्रह, कादंबरी, कथासंग्रह, निबंध, समीक्षा, आत्मकथा अशा विविध साहित्य प्रकारांतील विविध पुस्तकांची निवड करण्यात आली आहे. देशातील विविध भाषांमधील साहित्यिक परंपरेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या साहित्यकृतींना तज्ज्ञांच्या समितीद्वारे निवडण्यात आले आहे.

इतर भाषेतील साहित्य अकादमी पुरस्कार विजेते याप्रमाणे ( भाषा व लेखक)

* आसामी- देवब्रत दास
* बांगला -प्रसून बंद्योपाध्याय
* बोडो सहायसुली ब्रह्म
* डोगरी खजूर सिंह ठाकुर
* इंग्रजी नवतेज सरना
* गुजराती योगेश वैद्य
* हिंदी -ममता कालिया
* कन्नड अमरेश नुगडोगी
* कश्मीरी अली शैदा
* कोकणी एच एम. पेरनाळ
* मैथिली महेन्द्र झा
* मलयाळम् एन. प्रभाकरन
* मणिपुरी हाउबम नलिनी देवी
* नेपाली -प्रकाश भट्टराई
* ओडिया गिरिजाकुमार बलियारसिंह
* पंजाबी हरजिंदर पाल 'जिंदर'
* राजस्थानी जितेंद्र कुमार सोनी
* संस्कृत महामहोपाध्याय साधु भद्रेशदास
* संताली सुमित्रा सोरेन ( मरणोत्तर )
* सिंधी भगवान अटलानी
* तमिळ एस. तमिळसेलवन
* तेलुगु नंदिनी सिद्धरेड्डी
* उर्दू प्रितपाल सिंह बेताब

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## यंदा मुंबई तुंबणार नाही याची खात्री देते, आयुक्त अश्विनी भिडे यांचं मुंबईकरांना आश्वासन



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदी अश्विनी भिडे या विराजमान झाल्या. भूषण गगराणी यांच्याकडून त्यांनी पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारल्यावर पत्रकार परिषदेत बोलताना ''यंदा मुंबई तुंबणार नाही'' याची त्यांनी खात्री दिली. मुंबई आयुक्त पदावर काम करण्याची संधी दिल्याबद्दल अश्विनी भिडे यांनी महाराष्ट्र शासन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे आभार मानले. मुंबई महानगरपालिकेच्या समृद्ध परंपरेचा भाग होता येणार असल्याने याचा मला आनंद होतोय, असं त्या म्हणाल्या.

''मुंबई महानगरपालिकेमध्ये ॲडिशनल कमिशनर म्हणून काम करत असताना इथल्या सहकाऱ्यांची माहिती मला आहे. त्यामुळं सर्वांच्या सहकार्यानं शहरासाठी चांगलं काम करेन,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुंबई महानगरपालिकेमध्ये चार वर्ष ॲडिशनल कमिशनर म्हणून काम करताना मला कोविड काळातला अनुभव आहे, असं त्या म्हणाल्या.

मुंबईच्या पहिल्या महिला आयुक्त झाल्याबद्दल अश्विनी भिडे म्हणाल्या की, पहिली महिला आयुक्त झाले यासाठी माझे अभिनंदन केलं जात आहे. मुंबईत महिला सुरक्षित असल्यानं मोठ्या प्रमाणावर महिला वर्ग हा नोकरी करतो. हीच सुरक्षितता अजून चांगली करण्यासाठी मी काम करेन. पुढं नाले सफाई विषयी बोलताना त्या म्हणाल्या, ''मुंबई महानगरपालिका नेहमीच नालेसफाईचं काम व्यवस्थित करत असते. गेल्या काही वर्षांमध्ये फ्लड रेसिलियन्स बनवण्याचं काम मुंबई महानगरपालिकेतर्फे होत आहे. यंदाही त्याच प्रकारचं चांगलं काम करण्याचा प्रयत्न केला जाईल. नक्कीच यंदा मुंबई तुंबणार नाही याची खात्री मी देते.''

लोकप्रतिनिधींबरोबर काम करण्याची मला सवय आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन मिळूनच काम चांगलं होतं. आता लोकप्रतिनिधी आल्यामुळं खऱ्या अर्थानं मुंबई महानगरपालिका वाटत आहे, असंही त्या म्हणाल्या. भूषण गगराणी यांच्याविषयी बोलताना अश्विनी भिडे म्हणाल्या की, यशस्वीरित्या आयुक्त म्हणून काम केल्यानंतर ते सेवामुक्त होत आहेत. त्यांना बघूनच मी प्रशासनात आले. त्यांच्या भावी आयुष्यासाठी मी त्यांना शुभेच्छा देते. भूषण गगराणी यांनी देखील प्रशासनाचे व सहकाऱ्यांचे आभार मानले. मुंबई महानगरपालिकेवर मी महापौर आहे. याचबरोबर अश्विनी भिडे या आयुक्त झाल्या आहेत. यामुळं आता खऱ्या अर्थानं मुंबई महानगरपालिकेमध्ये महिलाराज आलं,'' अशी प्रतिक्रिया महापौर रितू तावडे यांनी दिली. मुंबईच्या नालेसफाईविषयी दर पंधरा दिवसांनी आम्ही मुंबईकरांना माहिती देणार आहोत. स्वतः नालेसफाईसाठी फील्डवर उतरणार आहे. माझ्यासकट सर्व नगरसेवक देखील नालेसफाईच्या कामासाठी फिल्डवर असतील. नालेसफाईवर आमचं बारीक लक्ष असणार आहे. मुंबई तुंबणार नाही, असं आशावादी आपण राहिलं पाहिजे,'' असं रितू तावडे म्हणाल्या.

# कृषी विभागामार्फत विविध पुरस्कार आता ऑनलाईन पध्दतीने स्विकारणार : कृषि मंत्री दत्तात्रय भरणे

## सन २०२५ करीता विविध कृषी पुरस्कार बाबतचे अर्ज ऑनलाईन करण्यासाठी १५ एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** कृषी विभागामार्फत देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदर प्रणाली कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra.gov.in) कृषी पुरस्कार टॅब मध्ये उपलब्ध आहे. सन २०२५ करीता विविध कृषी पुरस्कार बाबतचे अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करण्यास कृषी विभागाकडून मुदतवाढ देण्यात आलेली असून अंतिम मुदत दि.१५ एप्रिल २०२६ करण्यात येत आहे .तरी इच्छुक शेतकऱ्यांनी अर्ज करावेत असे आवाहन कृषिमंत्री



दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य हे कृषि उत्पादन व कृषि उद्योग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यामध्ये दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात अतुलनीय व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती तसेचसंस्थांचा सन्मान महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत करण्यात येतो.

यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न,वसंतराव नाईक कृषिभूषण,जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी,उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार इत्यादी पुरस्कारांचा समावेश आहे. हे पुरस्कार माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते प्रदान करून संबंधितांना सन्मानित करण्यात येते. यापूर्वी विविध कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत होते. प्रस्ताव बनविण्यासाठी व आवश्यक कागदपत्र जमा करणेसाठी होणारा त्रास व लागणारा खर्च यामुळे सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. या पारंपारिक पद्धतीमुळे प्रस्ताव सादरीकरण,पडताळणी व संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता. या पार्श्र्वभूमीवर पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदर प्रणाली कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra.gov.in) कृषी पुरस्कार टॅब मध्ये उपलब्ध आहे. सदर संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पुरस्कार प्रस्ताव सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन तसेच अहवाल निर्मिती ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात राबविणे शक्य होणार आहे.

यामुळे पुरस्कार प्रक्रियेची कार्यक्षमता, विश्र्वासार्हता व परिणामकारकता अधिक बळकट होणार आहे. इच्छुक शेतकरी/व्यक्ती/संस्था/गट यांना सन २०२५ करीता विविध कृषी पुरस्कार बाबतचे अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करणेची अंतिम मुदत दि.३१.०३.२०२६ होती. परंतु `पश्नळपश प्रणालीचे पहिलेच वर्षतसेच शेतकऱ्यांना पुरस्कारासाठी आवश्यक असलेला जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेकडील चारित्र्य पडताळणी दाखला प्राप्त करून घेण्यास लागणारा कालावधी या कारणास्तव काही अर्ज शेतकरी स्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे शेतकरी स्तरावरून व क्षेत्रीय स्तरावरून सदरची मुदत वाढवून मिळणेबाबत होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने सन २०२५ करीता विविध कृषी पुरस्कार बाबतचे अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करणेस कृषी विभागाकडून मुदतवाढ देण्यात आलेली असून अंतिम मुदत दि.१५ एप्रिल २०२६ करण्यात येत आहे .तरी इच्छुक शेतकऱ्यांनी दिलेल्या मुदतीत अर्ज करणेबाबत आवाहन करणेत येत आहे .

## बापाचा राग पोरावर काढला, वसईमध्ये चिमुकलल्या मारहाण करणाऱ्या प्रकरणाला धक्कादायक वळण; जुनं प्रकरण समोर

दैनिक आपला विदर्भ

**वसई/प्रतिनिधी :** वसई इथं एका नराधमाने किरकोळ वादाचा राग एका ४ वर्षाच्या निष्पाप चिमुकल्यावर काढला आहे. त्याने चिमुकल्याला अमानुषपणे मारहाण केली. या जीवघेण्या हल्ल्यात बालक गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर सध्या मिरा रोड येथील रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे संपूर्ण वसई-विरार परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान या प्रकरणाला धक्कादायक वळण मिळाले आहे.

जवळपास वर्षभरापूर्वी आरोपी संदीप पवार आणि जखमी चिमुरडा विघ्नेशचे वडील अतुल कोंढरे यांच्यात वाद झाला होता. रिनोवेशनच्या कामावरून संदीप पवार याने अतुल कोंढरे याच्या आईला शिवीगाळ केली होती. त्याच वेळी अतुल तिथे आला आणि दोघांमध्ये वाद झाला ज्याचं रूपांतर पुढे हाणामारीत झालं. अतुलने संदिपला मारलं होतं. याच गोष्टीचा राग संदीप पवार याच्या मनात होता.

हा राग बाहेर काढण्याची संधी त्याला मिळाली ती काल रात्री. सोसायटीमधील सगळी मुलं खेळत असताना अतुल यांचा मुलगा संदीप पवारच्या रिक्षात जाऊन बसला. ते पाहतच संदीप चिडला आणि त्याने थेट मुलाला लक्ष केलं. आधी रिक्षावर आपटलं, नंतर जमिनीवर आपटलं आणि फरफटत इमारतीच्या विंगमध्ये घुसला. विघ्नेशच्या आजीने हे पाहताच संदीपला रोखण्याचा प्रयत्न केला मात्र त्याने तीला देखील धक्का देत. लाथ मारत खाली पाडलं. तेवढ्यात अतुलचा आणखी एक मित्र मध्ये पडला आणि विघ्नेशला संदिपच्या तावडीतून वाचवलं.

महत्वाचं म्हणजे संदीप आणि अतुल हे जुने मित्र पण राग मनात धरला आणि होत्याचं नव्हतं झालं. घटनेनंतर जखमी मुलाला तत्काळ जवळच्या रुग्णालयात नेण्यात आलं, मात्र प्रकृती अधिक खालावल्याने त्याला मिरा रोड येथील मोठ्या रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. सध्या हा चिमुकला घ्णळ मध्ये मृत्यूशी झुंज देत असून त्याची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात येत आहे. या घटनेची माहिती मिळताच वसई पोलिसांनी तातडीने तपास चक्रं फिरवून आरोपी संदीप पवार याला अटक केली आहे. मुलाच्या वडिलांशी वाद असताना एका बालकावर असा निर्दयी हल्ला केल्यामुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे. आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी स्थानिक रहिवाशांकडून केली जात आहे. घटनेचा अधिक तपास केला जात आहे.

# देश नक्षलमुक्तीच्या शेवटच्या टप्प्यात? तीन राज्यात ४३ नक्षल्यांची रोकड आणि सोन्यासह शरणागती

दैनिक आपला विदर्भ

**गडचिरोली/प्रतिनिधी :** देशातील नक्षलवादाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिलेल्या ३१ मार्च या 'डेडलाईन'च्या दिवशी आंध्र प्रदेश, छत्तीसगड आणि गडचिरोलीत ४३ नक्षलवाद्यांनी एकूण ३ कोटी रोकड ७ किलो सोन्यासह आत्मसमर्पण केले.

देशातील १७० जिल्ह्यात एकेकाळी सत्तेला समांतर व्यवस्था राबवणाऱ्या नक्षलवादी चळवळीचे अस्तित्व आता केवळ दोन बड्या नेत्यांच्या अटकेवर अवलंबून असून, 'लाल गड' पूर्णपणे ढासळला असल्याचे चित्र आहे. मात्र, गृहमंर्त्यांनी दिलेल्या कालमर्यादेत देश नक्षलमुक्त झालेला नाही.

गेल्या ३६ वर्षांपासून पोलिसांच्या डोळ्यांत धूळ फेकून वावरणारा कुख्यात नक्षलवादी नेता सी. नारायण राव ऊर्फ सुरेश याने आंध्रप्रदेश पोलिसांसमोर आपल्या आठ सहकाऱ्यांसह आत्मसमर्पण केले. १.५ कोटींचे बक्षीस असलेला सुरेश २०१८ मधील विशाखापट्टणम येथील आमदार किदारी सर्वेश्वर राव यांच्या हत्येचा मुख्य सूत्रधार होता. या कारवाईमुळे आंध्र प्रदेश आता पूर्णपणे 'नक्षलमुक्त' झाल्याचा दावा पोलीस महासंचालक हरीश कुमार गुप्ता यांनी केला आहे.


गडचिरोली आणि छत्तीसगडच्या सीमावर्ती भागात छत्तीसगडमधील ९ जहाल नक्षलवाद्यांनी पोलिसांपुढे शस्त्रे टाकून आत्मसमर्पण केले. त्यामुळे गडचिरोलीत आता एकही सक्रिय नक्षल नसून पोलीस दरबारी नोंद असलेले सहा जण भूमिगत आहेत. त्याचवेळी छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात दण्डकारण्य स्पेशल जोनल कमिटीचे २५ जहाल नक्षलवाद्यांनी, मुख्य प्रवाहात येण्याचा निर्णय घेतला आहे. या शरणागतीमुळे नक्षलवाद्यांचे लष्करी बळच नाही, तर आर्थिक कंबरडेही मोडले आहे.

सुरक्षा दलांनी या कारवाईत तब्बल १४.०६ कोटी रुपयांची विक्रमी मालमत्ता जप्त केली आहे. यात २.९० कोटींची रोख रक्कम आणि ११.१६ कोटी रुपये मूल्याचे ७.२० किलो सोने हस्तगत करण्यात आले आहे. तसेच एके-४७, एलएमजी, एसएलआर आणि इन्सास सारखी ९३ घातक शस्त्रेही पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आली आहेत.

२००४ मध्ये पीपल्स वॉर ग्रुप आणि माओइस्ट कम्युनिस्ट सेंटरच्या विलीनीकरणानंतर 'भाकपा (माओवादी)' हा पक्ष आकाराला आला होता. मुप्पाला लक्ष्मण राव ऊर्फ गणपतीच्या काळात ही चळवळ १७० जिल्ह्यांपर्यंत फोफावली होती. मात्र, २१ मे २०२५ रोजी नंबला केशव राव ऊर्फ बसव राजूचा खात्मा झाल्यानंतर या चळवळीच्या पडझडीला वेग आला. पोलिसांच्या वाढत्या दबावामुळे दुसऱ्या फळीतील भूपती, देवजी यांसारख्या नेत्यांनी आधीच आत्मसमर्पणाचा मार्ग स्वीकारला आहे.

सध्या नक्षलवाद्यांच्या 'पॉलिट ब्युरो'मध्ये केवळ दोन सदस्य शिल्लक आहेत. यात ३.५ कोटींचे बक्षीस असलेला मुप्पाला लक्ष्मण राव ऊर्फ गणपती सध्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे नेपाळमध्ये लपल्याची शक्यता आहे, तर झारखंडचा रहिवासी असलेला मिशिर बेसरा बिहार-ओडिशा सीमाभागात सक्रिय असून त्याच्यावर १.५ कोटींचे बक्षीस आहे. यामुळे प्रशासनाला 'नक्षलमुक्ती'साठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

## शब्दकोडे क्र. 97



आडवे शब्द

१. कृष्णाचा मित्र ६. जवळपास, सभोवती ९. ढीग ११. प्रत्येक वर्षी १३. रस्ता १४. देशातील किंवा राज्यातील प्रमुख शहर १६. दृष्टिभेट १९. पूर्ण भरतीची वेळ २०. नवा २२. पृथ्वी २३. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नसणे २६. प्रत्येक दिवशी, मजुरी २७. जास्त २९. लता, वेल ३०. टिंगल ३१. बोटाच्या टोकावर असते ते ३२. खरेदी ३४. जुने, ऐतिहासिक लेखन ३६. वटवट ३८. जबरदस्तीने (हिंदी) ४०. चेहऱ्याची निमुळती बाजू ४२. ज्वारीची रोटी ४४. माल ४५. हिंदीत कालवा ४६. भाकरी-पोळीचा पाव भाग ४८. अपऱ्या नाकाची ५०. बांबू ५२. आंब्याची पोळी ५४. मांडणी ५६. हिशोबात केलेला गोंधळ ५७. चक्र ५८. रामाचा एक भाऊ ५९. वजनदार ६०. व्यापारी ६१. राजकारणातील पवार, जोशी या मान्यवरांचे नाव ६२. अनुकंपा, करूणा ६३. स्तुतीस्तोत्र ६५. भांडण ६७. मागचे अंगण ६९. प्रत्यक्षात ७१. आशीर्वाद, वर ७३. परंपरागत गण वा संपत्ती ७४. शेत ७५. कावळा ७६. जनन ७७. बळी जाणारा ७८. काळ्या पाठीचे हरीण ७९. उत्तराधिकारी ८०. ताक कुंफ्कून पिणारा ८१. मल्याळी भाषिक राज्य

उभे शब्द

१. श्रीकृष्णाचे आयुध २. दरवाजा ३. मत्स्य ४. आटोपते घेणे, आवरणे ५. जोरजबरदस्ती ६. कुंभाराची भट्टी, स्त्री ७. काचेचे पात्र ८. मध्यम प्रमाण ९. कृष्णसखी १०. सुनील गावस्करलिखित एक पुस्तक १२. नम्र १५. शिल्लक १७. असे असल्यास १८. धूळ २१. फायदा २४. नाजूकपणा नसलेले, भडक २५. प्रौढ, जून २६. थेट, स्पष्ट २८. ताणले जाणारे ३३. निमंत्रक, कुटुंबप्रमुख ३५. खणणे ३७. माळी, बागवान ४०. अडथळा, प्रश्न ४१. दरारा ४२. नशीब ४३. घोड्यावरून फेरी ४७. काटेरी औषधी वनस्पती ४९. अगदी थोडे ५१. नम्रपणे झुकलेला ५२. उंट हाकणारा ५३. अकस्मात ५५. त्रैलोक्यात फिरणारा मुनी ५६. महासर्प ५९. संधी ६१. नगर ६२. डुक्कर, ऱ्हस्व उच्चाराने खेकडा ६४. सततची हालचाल ६६. पटकन ६८. रामदासांचा ग्रंथ ६९. बैलांचा सण, बेंदूर ७०. दरवाज्यावरचा आवाज ७२. दृष्टी ७४. माठ, गाडगे ७५. कारस्थान ७८. मृत्यू

### शब्दकोडे क्र. 96 चे उत्तर

आडवे उत्तर

१.मोगल ३.सोमवती ६.मग ८.सदा ११.ताजमहाल १३.मजलदरमजल १६.लीन १८.यमुना २०.बरका २१.नाक २२.गरम २५.मतदार २६.बाट २७.करवट २८.कलमदान २९.ताई ३०.मना ३१.स्वीय ३४.वरवर ३७.करतल ४१.दामोदर ४४.तमा ४५.जळवात ४६.जर ४७.शूर ४८.वचनावचनी ५०.पाणी ५१.सराफ ५२.नार ५३.काळ ५४.शर ५६.पडदा ५७.खरवस ५८.समक्ष ६०.रविवासर ६३.कर्तन ६४.उदास ६६.सरण ६७.नद ६९.मदार ७०.वजीर ७१.वाणी ७२.रट्टा ७३.शरद ७४.भोकर ७५.पारोसा ७६.आरमार ७७.सापळा ८०.दुवा ८१.लक्ष ८२.मस्त ८३.पापणी

उभे उत्तर

१.मोगली २.लता ३.सोम ४.महा ५.वलय ६.मज ७.गलबत ८.सरकार ९.दाम १०.हलकट १२.जळमट १३.मना १४.दरदाम १५.जनाबाई १७.नगर १९.मुक्काम २३.रवरव २४.हकनाक २५.मनस्वी २७.करवत २९.ताठर ३२.यदा ३३.सटरफटर ३५.रमावर ३६.रचनाकार ३८.रजनीश ३९.तळ ४०.लवाद ४२.मोजणीदार ४३.दर ४७.शूरा ४९.वळवळ ५०.पाड ५१.सकवार ५२.नामकरण ५५.रसदार ५६.पक्ष ५७.खनन ५९.मस ६१.विसरभोळा ६२.सणवार ६४.उदाहरण ६५.अवदसा ६८.दरसाल ७३.शरम ७५.पावा ७८.पसा ७९.राणी

# शेतकऱ्याची एक हेक्टर आंब्याची बाग आगीत जळून खाक; १० ते १५ लाखांचे नुकसान

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे





**महारचिकना :** लोणार तालुक्यातील वडगाव तेजन येथे एका मेहनती शेतकऱ्याची एक हेक्टर आंब्याची फळबाग भीषण आगीत जळून खाक झाल्याची घटना ३० मार्च २०२६ रोजी सायंकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेत शेतकरी सत्यनारायण परमेश्वर तेजनकर यांचे अंदाजे १० ते १५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सत्यनारायण तेजनकर यांनी तीन वर्षांपूर्वी कृषी विभागाच्या माध्यमातून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत एक हेक्टर क्षेत्रावर आंब्याची फळबाग लागवड केली होती. अत्यंत मेहनतीने त्यांनी ही बाग जोपासली होती आणि यावर्षी झाडांना भरघोस फळधारणा झालेली होती. काही दिवसांतच आंबे बाजारात येण्याच्या तयारीत असताना ही दुर्घटना घडली.

दरम्यान, शेजारील शेतकरी सदाशिव सिताराम चौगुले यांच्या शेतातील गव्हाच्या काडाला आग लागली. त्या वेळी जोराचा वारा सुटल्यामुळे ही आग वेगाने पसरत तेजनकर यांच्या आंब्याच्या बागेत पोहोचली. काही क्षणातच आंब्याची संपूर्ण बाग आगीच्या विळख्यात सापडली.

घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र आग प्रचंड भीषण असल्याने सर्व प्रयत्न निष्फळ ठरले आणि काही मिनिटांतच संपूर्ण बाग जळून खाक झाली.

या आगीत फळबागेसोबतच फिनोलेक्स कंपनीचे २० मिमी ड्रिप पाइप, स्प्रिंकलर संच व इतर सिंचन साहित्य देखील जळून नष्ट झाले. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीही अतिवृष्टी व ढगफुटीमुळे तेजनकर यांच्या फळबागेचे नुकसान झाले होते. मात्र त्यांनी जिद्दीने पुन्हा उभारी घेत बाग तयार केली होती. आता पुन्हा आगीत सर्व काही उद्ध्वस्त झाल्याने शेतकऱ्यांपुढे मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे. पीडित शेतकरी सत्यनारायण तेजनकर यांनी सांगितले की, ''मी तीन वर्षांपूर्वी रोजगार हमी योजनेअंतर्गत ही आंब्याची बाग तयार केली होती. यंदा चांगली फळधारणा झाली होती. मात्र शेजारील शेतातील आगीमुळे माझे सर्वस्व जळून गेले. माझे १० ते १५ लाखांचे नुकसान झाले असून शासनाने तातडीने मदत करावी.'' दरम्यान, प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून शेतकऱ्याला योग्य ती नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी गावकऱ्यांकडून होत आहे. तसेच अशा घटना टाळण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्याची गरज व्यक्त होत आहे. सततच्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे जीवन अस्थिर होत असून शासनाने अशा पीडितांना त्वरित दिलासा देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## वृत्तविशेष...

### शासकीय हमीभाव केंद्रांची आज मुदत संपली, शासकीय हमीभाव केंद्रांना मुदत आणि उद्दिष्ट वाढवून देण्याची शेतकऱ्यांची मागणी





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा /प्रतिनिधी :** शासकीय भावाने मका खरेदी करण्यासाठी आज ३१ मार्च अखेरचा दिवस आहे, बुलढाणा जिल्ह्यातील हमीभाव केंद्रांना शेतकऱ्याची मका खरेदी करण्यासाठी ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती, परंतु शासनाने मका खरेदीसाठी दिलेले उद्दिष्ट आज पूर्ण होत आहे, परंतु अजूनही नोंदणी केलेल्या ७० टक्के शेतकऱ्यांच्या घरात मका अशीच पडून आहे. शासनाकडून मिळालेल्या उद्दिष्टांपैकी केवळ ३० टक्के शेतकऱ्यांची मका खरेदी करण्यात आली आहे. खाजगी बाजारामध्ये मका पिकाला अतिशय कमी भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांचा शासकीय हमीभाव केंद्राकडे कल आहे, मात्र आता मुदत आणि उद्दिष्ट संपल्याने शेतकरी आर्थिक कोंडीत अडकला आहे. त्यामुळे शासनाने बुलढाणा जिल्ह्यातील मका खरेदीसाठी उद्दिष्ट वाढवून शासकीय हमीभाव खरेदी केंद्रांना मुदत वाढ देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे

### वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा फटका; बुलढाण्यात पिकांचे मोठे नुकसान



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्ह्यात काल सायंकाळी व रात्री वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतात उभा असलेला गहू पिक पूर्णपणे आडवा झाल्याने शेतकरी हतबल झाला आहे. मागील आठवड्यातही जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह गारपीट झाली होती. त्या वेळी सुमारे ६ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले होते. या नुकसानीतून शेतकरी सावरत असतानाच पुन्हा एकदा अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. या अवकाळी पावसामुळे काढणीला आलेला गहू, हरभरा तसेच कांदा पिकांना मोठा फटका बसला आहे. विशेषतः गव्हाचे पीक पूर्णपणे झोपल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन मदतीचा हात द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

पतीनं घेतला गळफास, पत्नीनं १७ व्या मजल्यावरून मारली उडी; बंगळुरूमधील धक्कादायक घटना

बंगळुरू ३१ मार्च (पीएसआय)

कर्नाटकची राजधानी बंगळुरू येथील एका खाजगी अपार्टमेंटमध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर जोडप्यानं आत्महत्या केल्याचं वृत्त आहे. कोथनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या घटनेमुळं येथील स्थानिक रहिवाशांना धक्का बसला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना निकू होम्स-१ अपार्टमेंटमध्ये घडली. ही घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. ३२ वर्षीय भानू चंदर रेड्डी आणि त्यांची ३१ वर्षीय पत्नी शाझिया सिराज अशी मृतांची नावं आहेत. भानू चंदर रेड्डी हे मूळचे तेलंगणाचे होते.

नेमकं काय घडलं? : पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, थानिसंद्रा मुख्य रस्त्यावरील निकू होम्स-१ अपार्टमेंटमधील आपल्या फ्लॅटमधील एका खोलीत भानू चंदर रेड्डी गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळले. सोमवारी सकाळी भानू चंदर रेड्डी यांनी फ्लॅटचा दरवाजा उघडला नाही. त्यामुळं पत्नी शाझिया सिराज हिला संशय आला. त्यानंतर तिनं शेजाऱ्यांना आणि अपार्टमेंटच्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना बोलावले. यानंतर दरवाजा तोडून उघडला असता, त्यांना खोलीच्या आत भानू चंदर रेड्डी यांचा मृतदेह लटकलेल्या अवस्थेत आढळला. भानू चंदर रेड्डी यांचा मृत्यू झाल्याचं समजताच, पत्नी शाझिया सिराज धावत बाहेर गेली आणि तिनं त्याच इमारतीच्या १७ व्या मजल्यावरून उडी मारली. यात तिचा जागीच मृत्यू झाला.

'अनैसर्गिक मृत्यू' म्हणून गुन्हा दाखल : दरम्यान, घटनेची माहिती मिळताच कोथनूर पोलिसांचे एक पथक घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी घटनास्थळाची पाहणी केली. पोलिसांनी याप्रकरणी 'अनैसर्गिक मृत्यू' म्हणून गुन्हा दाखल

### रशियातील चेचेन आर्मी अमेरिकी सैन्याच्या विरोधात इराणच्या मदतीला उतरण्यास तयार

मास्को : अमेरिका आणि इराणमधील युद्ध अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अमेरिकेचे सैन्य इराणच्या भूमीवर उतरणार असल्याने हा संघर्ष अजून वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. इराण देखील अमेरिकी सैन्याचा समोरासमोर सामना करण्यासाठी सज्ज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. अशात रशियाच्या चेचेन आर्मीने इराणसाठी अमेरिकेच्या विरोधात मैदानात उतरण्यासाठी तयारी दर्शवली आहे.

प्रेस टिव्हीने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, अमेरिका-इस्रायलने इराणविरुद्ध छेडलेले युद्ध धार्मिक युद्ध असल्याचे मत रशियाच्या चेचेन प्रजासत्ताकाचे प्रमुख रमजान कादिरोव यांनी मांडले आहे. इस्लामिक प्रजासत्ताक इराणच्या संरक्षणासाठी चांगल्या विरुद्ध वाईटाची लढाईत थेट हस्तक्षेप करण्याचा इशाराच कादिरोव यांनी दिला आहे. याला त्यांनी जिहाद असेही म्हटले आहे. हवाई हल्ल्यानंतर देखील इराण मागे हटण्यास तयार नसल्याने अमेरिका आता इराणच्या भूमीवर उतरुन युद्ध करण्याची तयारी करत आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून देखील यासाठी ग्रीन सिग्नल मिळाल्याची माहिती आहे. अमेरिकी सैन्याच्या विशेष तुकडीचे सैनिक इराणमध्ये उतरुन समोरासमोर युद्ध करण्याची भीती वर्तवली जात आहे. यासाठी इराण देखील सज्ज असल्याचे आयआरजीसीच्या सैनिकांनी म्हटले आहे. यासाठी मोठ्या प्रमाणावर भरती केंद्रावर देशभक्त तरुणांची गर्दी पाहायला मिळत आहे.

## संग्रामपूर तालुक्यात वादळी पावसाचा फटका; मका पिकाचे मोठे नुकसान



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** संग्रामपूर तालुक्यात काल सायंकाळी झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे पळशी झाशी परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पावसामुळे शिवारातील मका पिक मोठ्या प्रमाणात आडवे पडले असून अंदाजे ४ ते ५ एकर क्षेत्र बाधित झाले आहे.

अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे उभे असलेले मका पीक अक्षरशः जमीनदोस्त झाले. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर मोठा परिणाम होणार असून आर्थिक संकट अधिक तीव्र झाले आहे. आधीच खर्च वाढ आणि बाजारातील अनिश्चित दर यामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना या नुकसानीमुळे दुहेरी फटका बसला आहे.

दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने पंचनामे करून मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे. एनडीआरएफच्या निकषानुसार नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. प्रशासनाने लवकरात लवकर पाहणी करून मदतीचा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## बुलढाणा पोलिस दलातील ७ अधिकारी-अंमलदार सेवानिवृत्त; सन्मानपूर्वक निरोप




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्हा पोलिस दलातील ७ पोलिस अधिकारी व अंमलदार दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. यानिमित्त पोलिस अधीक्षक कार्यालय, बुलढाणा येथे सन्मान व निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला पोलिस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलिस अधीक्षक अमोल गायकवाड, प्रभारी पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) बी.डी. पवार तसेच राखीव पोलिस निरीक्षक विकास तिडके व इतर अधिकारी उपस्थित होते.

सेवानिवृत्त होणाऱ्यांमध्ये पोउपनि संजय समाधान राठोड, पोउपनि अनिल बाबुराव पाटील, सपोनि राधेश्याम वेषाव, सपोनि कृष्णा महादेव चौधरी, सपोनि संजय मुंकिन्दा तोर, पोहेकॉ रत्न भीमराव वाणी आणि पोका पंढरीनाथ पुंडलिक जाधव यांचा समावेश आहे.

कार्यक्रमात सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदारांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार, सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या भावी आयुष्यासाठी व उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाला कुटुंबीय व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. समारंभानंतर उपस्थितांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

### मध्य पूर्व युद्धाचा ३२वा दिवस; इराण-इस्रायल संघर्ष अधिक तीव्र

तेहरान : मध्य पूर्वेमध्ये सुरू असलेल्या युद्धाचा आज ३२वा दिवस आहे. अमेरिका आणि इस्रायल यांनी २८ फेब्रुवारी २०२६ रोजी इराणवर हल्ला सुरू केल्यानंतर संपूर्ण मध्य पूर्वेमध्ये तणाव कायम आहे. एक महिना उलटल्यानंतरही हल्ले आणि प्रत्युत्तरात्मक कारवाया सुरूच असून सलग ३२व्या दिवशीही स्फोटांचे आवाज ऐकू येत आहेत. मंगळवारी पहाटे इराणने इस्रायलची राजधानी जेरुसलेमवर हल्ला केला, तर इस्रायलने तेहरानमध्ये हल्ले केल्याने तेथील काही भागांतील वीजपुरवठा खंडित झाला. याशिवाय लेबनानमध्ये लष्करी कारवाईदरम्यान चार इस्रायली सैनिकांचा मृत्यू झाला. इस्फहान प्रांताचे राज्यपाल कार्यालयातील सुरक्षा अधिकारी अकबर सालेही यांच्या हवाल्याने माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार, प्राथमिक तपासात काही लष्करी तळांना लक्ष्य करण्यात आल्याचे समोर आले आहे. मात्र नेमक्या ठिकाणांची माहिती त्यांनी दिलेली नाही. नुकसान किती झाले किंवा कोणती जीवितहानी झाली का, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. इस्फहान प्रांत हा इराणच्या संरक्षण उद्योगाचा महत्त्वाचा केंद्रबिंदू मानला जातो.

## कांद्याच्या शेतात अफूची बेकायदेशीर लागवड; ४४ लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक आपला विदर्भ





**देऊळगाव राजा (बुलढाणा)/ प्रतिनिधी :** अंढेरा पोलीस स्टेशन हद्दीतील धोत्रा नंदाई शिवारात कांद्याच्या पिकात आंतरपीक म्हणून बेकायदेशीररीत्या लावलेली अफूची झाडे जप्त करत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मोठी कारवाई केली. या कारवाईत सुमारे ४४ लाख ५३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका शेतकऱ्याला ताब्यात घेण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे संबंधित शेतावर धाड टाकली असता कांद्याच्या उभ्या पिकामध्ये अफूची झाडे लपवून लावण्यात आल्याचे आढळून आले. विशेष म्हणजे ही लागवड कुणाच्या लक्षात येऊ नये यासाठी कांदा पिकामध्येच आंतरपीक म्हणून करण्यात आली होती. या प्रकरणी संजय तुकाराम चेके (रा. सरंबा, ता. देऊळगाव राजा, जि. बुलढाणा) याला ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपीच्या ताब्यातून ओलसर अफूची बोंडे असलेली झाडे, एकूण वजन १११ किलो ३३ ग्रॅम, असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी अंढेरा पोलीस स्टेशन येथे अंमली औषधीद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम ( ) कलम ८(क), १८(क) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून बेकायदेशीर शेतीविरोधात पोलिसांची कारवाई अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.